**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३/२०२६**
**मधील निशाणी १ वरील आदेश**
(रेश्मा रविंद्र सावंत व.३ वि. कोणीही नाही)
(**CNR No**. **MHSI**04-0002682026)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्रमांक १ ते ३ यांनी वारस दाखला मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**<u>अर्जातील थोडक्यात कथन असे कीः-</u>**

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मूळ रा. प्रभावळकरवाडी, कुडाळ ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र.१ हीचे पती तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील रविंद्र सुरेश सावंत हे दि.२३.०२.२०२६ रोजी गांव म्हापसा, गोवा येथे मयत झालेले आहेत. त्यांना वारस म्हणून अर्जदार क्र.१ पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ अशी दोन मुले आहेत. याव्यतिरीक्त त्यांना अन्य कोणीही वारस नाहीत.

३. सदर अर्जामध्ये अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जाचा विषय असलेले कै. रविंद्र सुरेश सावंत यांचे नावे असलेले वाहन Model name- Bajaj RE CNG 45 FI, Regn. No. MH-07-AH-4911, Regn. Date 24/07/2025, Chassis no. MD28478X2SWC45492, Engine no. AZXWSC46856 हे वाहन रविंद्र सुरेश सावंत यांचे मृत्यूनंतर अर्जदार क्र.१ हिचे नावे ट्रान्स्फर करणेस अर्जदार क्र.२ व ३ यांची पुर्ण संमती आहे. सदरचे वाहन हे अर्जदार क्र.१ हिचे नावे होण्याकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासणारी आहे. त्यामुळे अर्जदारांनी सदरचा अर्ज न्यायालयात दाखल केला आहे.

४. हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६ मधील कलम ८ नुसार मृत्युपत्र न करता मरण पावणाऱ्या हिंदू पुरुषाची संपती पहिल्यांदा जे वारस अनुसुचीच्या पहिल्या वर्गामध्ये विनिर्दीष्ठ केल्याप्रमाणे नातलग असतील त्यांच्याकडे प्रक्रांत होईल. अनुसूची वर्ग क्रमांक १ मध्ये पुत्र, कन्या,

विधवा व आई यांचा समावेश आहे. प्रस्तुत अर्जात अर्जदार क्र.१ ते ३ यांनी ते मयत रविंद्र सुरेश सावंत यांचे कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांना मिळण्यासाठी विनंती केली आहे. अर्जदारांनी विनंती केलेप्रमाणे दाखला मिळणेस पात्र आहेत अथवा नाहीत हे पाहण्याकरीता अर्जदार यांनी दाखल केलेल्या लेखी व तोंडी पुराव्याचे अवलोकन करण्यात आले.

५. प्रस्तुत प्रकरणात दि.०५/०४/२०२६ रोजी दैनिक सकाळ, सिंधुदुर्ग आवृत्ती मध्ये प्रसिद्ध झालेली जाहीर नोटीस **नि.१५** वर दाखल केली आहे. अर्जदार क्र.१ ने त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.१०** वर दाखल केले आहे. अर्जदार क्र.२ ने त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.११** वर दाखल केले आहे. अर्जदार क्र.३ ने त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.१२** वर दाखल केले आहे. अर्जदाराने पुरावा बंद पुरसिस **नि.१६** वर दिली आहे. अर्जदार यांनी निशाणी **क्र.५** वर मयत रविंद्र सुरेश सावंत यांच्या मृत्यू नोंद दाखल्याची झेरॉक्स प्रत, निशाणी **क्र.४/३** वर वाहन क्र.एम.एच.–०७–ए.एच.–४९११ चे आर.सी.बुक ची झेरॉक्स प्रत, निशाणी **क्र.४/४ ते निशाणी क्र.४/६** वर अर्जदार क्र.१ ते ३ यांचे आधारकार्डची झेरॉक्स प्रत. निशाणी **क्र.४/७** वर रेशनकार्डची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. अर्जदारचा शपथेवरील जबाब व प्रकरणातील सर्व कागदपत्रे याबाबत कोणताही आक्षेप कोणीही न घेतल्यामुळे अर्जदार यांचा पुरावा शाबीत झालेला आहे.

६. हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६ मधील कलम ८ नुसार मृत्युपत्र न करता मरण पावणाऱ्या हिंदू पुरुषाची संपत्ती पहिल्यांदा जे वारस अनुसुचीच्या पहिल्या वर्गामध्ये विनिर्दीष्ठ केल्याप्रमाणे नातलग असतील त्यांच्याकडे प्रक्रांत होईल. अनुसूची वर्ग क्रमांक १ मध्ये पुत्र, कन्या, विधवा व आई यांचा समावेश आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती तेच अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील दिनांक २३.०२.२०२६ रोजी मयत असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. अर्जदार नं.१ ते ३ हे मयत रविंद्र सुरेश सावंत यांचे वर्ग १ मधील वारस असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याने मयत रविंद्र सुरेश सावंत यांचे कायदेशीर वारस असल्याचा दाखला मिळणेस न्यायोचित होईल.

**७.** अर्जदार यांची कथने व दाखल कागदोपत्री पुराव्यावरुन मयत रविंद्र सुरेश सावंत यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच मूळ व कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते. वरील सर्व विवेचनावरुन अर्जदार क्र.१ ते ३ यांना वारसा दाखला देणे न्यायाचे दृष्टीने योग्य व उचीत होणार आहे. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–:आ दे श:–**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत रविंद्र सुरेश सावंत यांचे पश्चात अर्जदार क्र.१ ते ३ हे त्यांचे कायदेशीर वारस असलेबाबत तसा वारसा दाखला अर्जदार क्र.१ ते ३ यांना योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन देण्यात यावा.

३. सदर वारस दाखल्याचा उपयोग फक्त अर्जामध्ये नमुद केलेल्या कारणाकरीताच करण्यात यावा.

सही/–

दिनांक – १०/०६/२०२६

( एन.ए.बकरे )

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कुडाळ